संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कथा आदरे शिवबाची करावी ।

**समर्थ रामदासांनी** आपल्या मनाच्या श्लोकामध्ये केलेल्या एका श्लोकाचा अर्थ हा मनाच्याऐवजी जनासाठी म्हणजेच देशातील जनतेसाठीसुध्दा जसाच्या तसा लागू होऊ शकतो. समर्थांची क्षमा मागून असे म्हणता येईल

जना रे मनी मौन्य मुद्रा धरावी।

कथा आदरे शिवबाची करावी।

समर्थांनी मनाला बोध केला परंतु त्याच समर्थांनी प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनाही बोध केला होता. आणि त्यांचे श्रीमंत योगी असे वर्णन करून मुघल सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी आग्रहही केला होता. याच शिवाजी महाराजांना त्यांनी जाणता राजा असे यथार्थ विशेषण लावून त्यांच्या कर्तृत्वाचा आणि नेतृत्वाचा गौरवही केला होता. आज तारखेप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे. शासकीय स्तरावर तारखेने जयंती साजरी होते. तर अनेक ठिकाणी अनेक संघटना तिथीप्रमाणे महाराजांच्या कर्तृत्वाला अभिवादन करीत असतात. आज तीनशे साडेतीनशे वर्षानंतरही महाराजांच्या या कर्तृत्वाचे पोवाडे इतिहास गातो आहे आणि पुढची अनेक शतके तो असाच गात राहाणार आहे. किंबहुना आज देशाची किंवा समाजाची ही परिस्थिती आहे. ती पाहिल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अवतार या महाराष्ट्र भूमीवर झाला म्हणून या देशाला विजयी इतिहास पाहायला मिळाला. जर महाराज नसते तर आज देशाची अवस्था ही इस्लामी राष्ट्र म्हणूनच झाली असती. महाराजांनी सर्वशक्तीनिशी साडेतीनशे वर्षापूर्वी केलेला शौर्याचा शंखनाद आजही वातावरणामध्ये दुमदुमत असतो. किंबहुना त्यांच्या या युध्द नीतीनेच देश , संस्कृती, धर्म टिकून राहू शकतो असे चिरंतन टिकणारे संचित आपल्याला बहाल केले. केवळ स्वतःच्या एकट्याच्या युध्द आणि राजनीतीच्या जोरावर त्यांनी दिल्लीचाही तख्त गाजवणाऱ्या औरंगजेबापासून ते आदिलशहापर्यंत अनेकांना सळो की पळो करून सोडले. या शौर्याची परिसीमा म्हणजेच त्यांनी जिंकलेले दिडशे किल्ले आहेत. जे आजही त्याच विजयाची शौर्याची आणि स्वाभिमानाची मानसिकता बदलून त्याच्यासमोर विजयाचा साक्षात्कार घडवण्याचे आव्हान महाराजांनी यशस्वी करून दाखवले. त्यांच्या जयंतीनिमित्ताने याच कर्तृत्वाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये त्याचे संक्रमण झाले पाहिजे.

## आजच्या पिढीसाठी शौर्य

महाराजांनी दिलेला हा विजयाचा किंवा शौर्याचा वसा टिकवून ठेवण्याची जबाबदारी आताच्या समाजाची आहे. संपूर्ण महाराष्ट्र मुघलीसत्तेच्या अंमलाखाली होता. पूर्वीच्या मोठमोठ्या राजांनीसुध्दा मुघलांचे मांडलिकत्व स्वीकारून गुलामीचे प्रदर्शन मांडले होते. अशा परिस्थितीत यवनांची सत्ता उलथवणे आणि स्वजनांची मानसिकता बदलवणे अशा दोन्ही आघाड्यांवर महाराजांना कार्य करावे लागले. त्यासाठी स्वतःच्या जीवन व्यवहारातून आदर्श घालून द्यावे लागले. आपल्या राजाचा त्याग, शौर्य , स्वाभिमान आणि त्याच पध्दतीचे स्वजनांवरचे प्रेम पाहून त्यावेळच्या मावळ्यांनी शिवाजी महाराजांसाठी आपलेही सर्वस्व देऊ केले होते. हिंदवी स्वराज्य अशी लोकविलक्षण संकल्पना मांडून लोकांच्या मनातून लोप पावत चाललेल्या धर्माचे स्फुल्लिंग त्यांनी चेतवले आणि आक्रमकांपुढे त्याच ताकदीच्या शौर्याचे जबरदस्त आव्हान उभे केले. म्हणूनच महाराजांची राजनीती आणि युध्दनीती ही अभूतपूर्व स्वरुपाची ठरली ज्याचा जगातल्या मोठमोठ्या इतिहासकारांनी अभ्यास केला. मर्यादित साधनसामुग्रीमध्ये त्यांनी संपादन केलेल्या या यशाची जगाला दखल घ्यावी लागली. म्हणूनच आजही मोठमोठ्या विद्यापीठांमध्ये शिवाजी महाराज एकव्यक्ती म्हणून जसा अभ्यासाचा विषय ठरतो तसाच तो एक विचार म्हणूनही अभ्यासला जातो. ज्यामधून युध्द कौशल्याची आणि राज्यकारभाराची उदाहरणे सापडतात. आजची देशभरातली परिस्थिती पाहिल्यानंतर महाराजांच्या या कर्तृत्वाचा नीट अभ्यास केला तर कोणत्याही शत्रूची भारताकडे वाकड्या नजरेने पाहाण्याची हिंमत होणार नाही. दुर्दैवाने तशी प्रवृत्ती दिसत नाही. केवळ देशाभिमान दाखवून विजय मिळवता येतो. अशी चुकीची समजूत करून घेतली गेली. परंतु स्वाभिमानाबरोबर युध्दनीतीमध्ये उपयोगी पडणारे शौर्य आणि शत्रूला नामोहरम करणारा गनिमी कावा तितकाच महत्वाचा ठरतो. सर्व प्रकारच्या आधुनिक सोयीसुविधा किंवा तंत्रज्ञान उपलब्ध असूनही दहशतवादासारख्या संकटाने देशाला भंडावून सोडावे हे आश्चर्यकारक ठरते. ज्या काळात महाराजांकडे कोणत्याही सुविधा नव्हत्या पण त्यांनी याच मुघलांचा दहशतवाद मोडून काढला होता. आजही जर तोच दहशतवाद नाहीसा करायचा असेल तर पुन्हा एकदा महाराजांनी जोपासलेली युध्दनीती आणि मुत्सद्देगिरी अंमलात आणावी लागेल.

## अफजलखानी दहशतीचा कोथळा

आजच्या या राष्ट्रीय परिस्थितीचा विचार केला तर इतिहास हा कसा धडे शिकवतो. हे सहजपणे लक्षात येते. काश्मिरमधली आजची परिस्थिती म्हणजे आजच्या राज्यकर्त्यांची फसलेली राजनीती ठरते. त्याचा उपयोग युध्दनीतीच्या मदतीने अधिक चांगल्या पध्दतीने करून घेता येऊ शकतो. महाराजांच्या काळात अशीच अफजलखानी दहशत पसरवली गेली होती. प्रचंड सेना आणि धिप्पाड देह असलेल्या अफजलखानाला महाराजांनी याच युध्दनीती आणि राजनीतीच्या माध्यमातून नाहीसे केले होते. त्या अफजलखानाचा कोथळा बाहेर काढून त्याच्या मनसुब्यांना छिन्नविछिन्न केले होते. दुर्दैव असे आहे की त्याच अफजलखानाची कबर आजही आपण शाबूत ठेवलेली आहे आणि हीच राजनीतीने युध्दनीतीवर केलेली कुरघोडी ठरते. नव्हे ती सर्वात मोठी घोडचूक ठरते. महाराजांचे प्राण घ्यायला आलेल्या अफजलखानाला नाहीसे केल्यानंतरही त्याची कबर बांधली गेली परंतु आज ती कबर जपण्याचे कोणतेही कारण उरत नाही. त्याकाळात अफजलखान ही जशी देशद्रोही वृत्ती होती. तशीच आजही काश्मिर आणि देशाच्या काही भागात तीच प्रवृत्ती पाहायला मिळते. आक्रमकांच्या या कबरी कधीच उद्ध्वस्त व्हायला हव्या होत्या. परंतु त्या जपल्या गेल्यामुळे भारतात दहशतवादाचा उरून भरवला जातो. अशावेळी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहात असताना त्यांनी आक्रमकांचा कोथळा बाहेर काढण्याचे जे शौर्य दाखवले त्याचेच वारंवार स्मरण झाले पाहिजे.